गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन



भारती विद्यापीठाचे

डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली

# संवाद-भारती

**A Tri - Monthly News Letter**

Apr -Jun :2017





संपादक मंडळ

अध्यक्ष : डॉ.डी.जी.कणसे

मुख्य संपादक : डॉ.संतोष माने

कार्यकारी संपादक :प्रा.अमोल वंडे

सदस्य:

डॉ.बी.डी.पाटील

प्रा.एम.एच.पाटील

# बीटकॉन सारख्या डिजिटल करन्सी अर्थव्यवस्थेसाठी धोकादायक की

**मागील संसदीय अधिवेशनात अर्थराज्यमंत्री श्री अर्जुन राम मेघवाल यांनी संसदेत 'बिट-कॉइन' अथवा तत्सम डिजिटल-चलनाबाबत भारत-सरकारची भूमिका स्पष्ट केली. डिजिटल चलनाद्वारे झालेली पैश्याची देवाण-घेवाण हि रिजर्व्ह बँक ऑफ इंडिया प्रमाणित करत नसल्याने असे व्यवहार हे अवैध समजले जातील अशी सध्याची भूमिका आहे. हा विषय जरी नोटा-बंदी एवढा सर्वसामान्यांच्या जीवनावर परिणाम करणारा नसला, तरी सरकारची भूमिका 'बिट-कॉइन' या डिजिटल-चलना भोवती असलेले गुढतेचे वलय अधिक गडद करणारी आहे. या भूमिकेचे डिजिटल-अर्थव्यवस्थेवर होणारे संभाव्य दूरगामी परिणाम काय असतील हे समजावून सांगण्याचा सदर लेखाचा हेतू आहे.**



## डिजिटल -चलन म्हणजे काय?

पैसा या संकल्पनेचे सर्वमान्य व शासन मान्य स्वरूप म्हणजे चलन. व्यवहारात चलन अनेक स्वरूपात आढळतात. जसे कि नाणे, नोटा, चेक, डिमांड-डराफ्ट, व क्रेडिट कार्ड (प्लास्टिक मनी). वस्तू अथवा सेवा यांची देवाण-घेवाण सुलभ करणे हा चलनाचा मुख्य उद्देश असतो. अशा चलनाची निर्मिती एक तर रिजर्व्ह बँक ऑफ इंडिया अथवा शासन मान्य आर्थिक संस्था करतात. मुख्यतः नाणे व नोटा यांची निर्मिती केंद्रीय बँका द्वारे केली जाते. तर चेक, डिमांड दराफ्ट आणि क्रेडिट कार्ड सारखे चलन खाजगी व सरकारी बँकाद्वारे निर्गमित केले जाते.

ऐतिहासिक दृष्ट्या त्या-त्या काळातील प्रभावशाली पदार्थाच्या माध्यमात चलन उपलब्ध करून दिले जाते. जसे कि सोने, चांदी, मिश्रधातू, पेपर अथवा प्लास्टिक या माध्यमात आजपर्यंत चलनाचे स्वरूप बदलत गेले. आजच्या माहिती-युगात, 'माहिती'च्या स्वरूपातील चलन म्हणजेच **डिजिटल चलन (Cryptocurrency/Digital Currency)**. तुमच्या बँक अकाऊंटच्या 'जमा' या सदराखालील नंबर म्हणजेच तुमच्याकडे जमा असलेले पैसे. अश्या साध्या संकल्पने वर डिजिटल चलन आधारित आहे. 'बिट-कॉइन' हे असेच एक इंटरनेटद्वारे होणाऱ्या आर्थिक व्यवहारात वापरात असलेल्या अनेक डिजिटल-चलना पैकी एक.

## डिजिटल -चलन कसे उपलब्ध करून दिले जाते?

आर्थिक व्यवहारासाठी चलन उपलब्ध करून देण्यापूर्वी, चलन अवैध मार्गाने निर्माण करता येणार नाही याची खबरदारी बँकांना घ्यावी लागते. जसे कि दोन हजार रुपयांची नकली नोट छापणे अवघड करणे. यासाठी बँका करंसी नोटेवर वेगवेगळ्या सुरक्षा वैशिष्ट्याचा वापर करतात. असे सुरक्षित चलन इंटरनेट द्वारे होणाऱ्या आर्थिक व्यवहारासाठी उपलब्ध करून देणे हे एक माहिती तंत्रज्ञानासाठी आव्हान होते. जे २००८ साली पहिल्यांदा **"ब्लॉक-चैन"** या टेक्नॉलॉजीचा वापर करून शक्य झाले.

"ब्लॉक-चैन" हि एक आर्थिक व्यवहाराची अशी **अक्षय-नोंदवही (Immutable Ledger)** आहे, ज्या नोंदवहीतील नोंदी बदलणे शक्यच नाही. या नोंदवहीत बिट-कॉइन वापरून करण्यात आलेल्या सर्व व्यवहारांची नोंद घेतली जाते. हि नोंदवही एकाच मुख्य संगणकावर न ठेवता नेटवर्क मधील सर्व संगणकावर ठेवण्यात येते.

२००८ पासून आज पर्यंत जवळपास पावणे-दोन कोटी बिट-कॉईन्स सर्कुलेशन मध्ये आहेत व **एका 'बिट-कॉइन'चे ३० मार्च २०१७ रोजी बाजार मूल्य ६७,९४० रु होते.** बिटकॉइन द्वारे व्यवहार करण्यास इच्छुक असणारे ग्राहक भारतीय रुपया देऊन या विनिमय दराने बिटकॉइन एक्स्चेंज मधून बिटकॉइन खरेदी अथवा विक्री करू शकतात. इतर चलनाप्रमाणे बिटकॉइन हे कोण्या एका देशाचे चलन नसून ते एक वैश्विक चलन आहे.

## डिजिटल-चलनाद्वारे होणारे आर्थिक व्यवहार धोकादायक का वाटतात ?

त्या पाठीमागचे प्रमुख कारणे म्हणजे:१) डिजिटल-चलनाद्वारे होणाऱ्या आर्थिक व्यवहारासाठी ग्राहकांना **केवायसी (Know Your Customer)** ची पूर्तता करण्याची आवश्यकता नसते. त्या-मुळे असे व्यवहार बेनामी अथवा निनावी होतात.

२) बेनामी अथवा निनावी व्यवहारात प्रामुख्यने गैर मार्गाने कमविण्यात आलेला पैसा मोठ्या प्रमाणात गुंतविण्यात येतो. असा शासनाचा आजपर्यंतचा अनुभव आहे.

३) डिजिटल-चलनाद्वारे होणाऱ्या आर्थिक व्यवहारासाठी, त्रयस्थ पक्षा कडून ग्राहकाच्या आर्थिक क्षमते बाबत पडताळणी होत नसते. त्या-मुळे असे व्यवहार नियंत्रित करणे व त्यांची देखरेख करणे हे शासनाला अवघड जाते.

४) डिजिटल-चलनाचा वापर हा नजीकच्या भूतकाळात ड्रग ट्रॅफिकिंग साठी झालेला आहे.

५) डिजिटल चलन परावर्तित करून देणाऱ्या खाजगी कंपन्यांची बाजारातील विश्वासार्हता अजून सिद्ध व्हायची आहे.

डिजिटल चलनाच्या वैधते बाबत वेगवेगळ्या देशांनी वेगवेगळी भूमिका घेतली आहे. अमेरिका व इंग्लड मध्ये डिजिटल चलनाला त्या देशांतील केंद्रीय बँकेची मान्यता आहे. चीन सारख्या देशात खाजगी कंपन्यांना डिजिटल चलनाद्वारे व्यवहार करण्यास मान्यता आहे पण बँकांना नाही. फ्रान्स मध्ये डिजिटल चलनाची देवाण-घेवाण करणाऱ्या ग्राहकांची ओळख पटवून घेतली जाते व असे व्यवहार फक्त एका ठराविक रकमे पर्यंत करता येतात. तर बांगलादेश सारख्या देशात असे व्यवहार करणाऱ्याना शिक्षा करण्यात येते.

## डिजिटल चलन आश्वासक केव्हा ठरते?

डिजिटल-चलनाच्या वैधते बाबत जरी प्रत्येक देशांची वेगवेगळी मते असली तरी डिजिटल-चलन ज्या टेक्नॉलॉजी वर आधारित आहे त्या 'ब्लॉक-चैन' या टेक्नॉलॉजी च्या क्षमतेबाबत अर्थशास्त्री, समाजशास्त्री व संगणक अभियंते यांचे एकमत आहे. डॉन टोपस्कॉट या टेक्नॉलॉजी भविष्यवेत्याच्या मते,

हि टेक्नॉलॉजी इंटरनेट नंतरची सर्वात क्रांतिकारक संकल्पना आहे.अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक प्राप्त मिल्टन फ्राईडमन यांच्या मते,डिजिटल-चलन हि एक अशी संकल्पना आहे, जी सरकारची समाजव्यवस्थेतील भूमिका कमी करील.

या सर्व लोकांना ब्लॉक-चैन हि टेक्नॉलॉजी आश्वासक वाटण्यापाठीमागची प्रमुख कारणे म्हणजे –

१) या टेक्नॉलॉजी वापर करून मध्यस्थाविना (बँक, अथवा पेमेंट गेटवे ) पैश्याची देवाण-घेवाण शक्य होणार आहे.

२) जास्तीत-जास्त लोकांचा अर्थव्यवस्थेत सहभाग वाढेल.

३) अर्थ व्यवहारासाठी लागणाऱ्या वेळेत कपात होईल.

४) सरकारशाहीस व भ्रष्टाचारास आळा बसेल, कारण सरकारी अनुदान व परदेशी अर्थ साहाय्य हे लाभार्थींना मध्यस्थाविना मिळेल.

५) ग्राहकाची माहिती मध्यस्थ बँका अथवा पेमेंट-गेटवे त्रयस्थ पक्षास ग्राहकांच्या परवानगीविना विकतात व नफा कमवितात. अश्या नफेखोरीला आळा बसेल.

## शिक्षक दिन | ५ सप्टेंबर २०१५

पुण्य नगरी
कोल्हापूर - सांगली ▮ रविवार, ९ एप्रिल २०१७

# जिल्हा प्राचार्य असोसिएशनची कार्यकारणी जाहीर

### डॉ. डी. जी. कणसे अध्यक्ष तर, बी. व्ही. ताम्हणकर खजिनदार


डी.जी.कणसे


बी.व्ही.ताम्हणकर


डॉ. कुरळपकर


एस.आर.पाटील


उज्वला पाटील

**सांगली / प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांची नुकतीच बैठक झाली. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात झालेल्या या बैठकीत सांगली जिल्हा प्राचार्य असोसिएनशच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

या कार्यकारिणीत डॉ. कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांची अध्यक्षपदी तर, कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर, विश्वासराव नाईक महाविद्यालय, शिराळ्याचे प्राचार्या डॉ. उज्वला पाटील यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तर चिखली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील यांची सचिव आणि विलिंग्डन महाविद्यालयाचे प्राचार्य बी. व्ही ताम्हणकर यांची खजिनदार म्हणून निवड करण्यात आली.

प्राचार्य डॉ. एस. बी. माने यांनी असोसिएशनच्या कामकाजाची माहिती दिली. अध्यक्षपदाची जबाबदारी मिळाली असल्याने विद्यार्थी, प्राध्यापक, महाविद्यालयांशी संबंधित प्रश्न, कल्याणकारी योजना राबविणे यासह सहसंचालक, उच्चशिक्षण विभाग, विद्यापीठ व महाविद्यालयातील दुवा साधत विकासासाठी सकारात्मक प्रयत्नशील राहणार असल्याचे असोसिएशनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. कणसे यांनी यावेळी सांगितले. कोषाध्यक्ष आर. डी. सावंत यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

रविवार सांगली, ९ एप्रिल २०१७ । किंमत ₹ चार * आजचा अंक : पाने ३० (१०+४+१६)
सकाळ

### प्राचार्य असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. कणसे



सांगली, ता. ८ : सांगली जिल्हा प्राचार्य असोसिएशनच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांची एकमताने निवड करण्यात आली. कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर, शिराळ्याच्या विश्वासराव नाईक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उज्वला पाटील यांची उपाध्यक्षपदी तर चिखली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील यांची सचिवपदी निवड करण्यात आली. विलिंग्डन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. व्ही. ताम्हणकर यांची खजिनदारपदी निवड करण्यात आली. या वेळी डॉ. एस. बी. माने यांनी असोसिएशनचा धावता आढावा घेतला. याप्रसंगी शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशनचे कोषाध्यक्ष प्राचार्य आर. डी. सावंत यांच्या हस्ते कार्यकारिणीतील सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

तरुण भारत
बुधवार, ३१ मे २०१७
सांगली पान ५

### डॉ. कदम महाविद्यालयाची निकालाची परंपरा कायम

**सांगली :** सांगली येथील भारती विद्यापीठ डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय सांगली इयत्ता १२ वी विज्ञान शाखेचा निकाल १००टक्के लागलेला आहे. कला शाखेचा निकाल ८२.०टक्के तर व्यावसायिक शिक्षण विभागाचा निकाल ९१.०० इ लागलेला आहे. शैक्षणिक वर्षांत २०१६ – २०१७ मधील इयत्ता १२ वी निकालाची परंपरा कायम राखली असल्याचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी सांगितले.

महाविद्यालयाच्या विज्ञान विभागात कुमार ऋषीकेश राजेंद्र पाटील ८०टक्के मार्क मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. द्वितीय क्रमांक कुमार सौरभ शंकर पाटील ७७.५३ टक्के व तृतीय क्रमांक कुमार निखिल मारूती पाटील. कला शाखेत कुमारी सांबळे रूक्मणी भिकू ८० टक्के मार्क मिळवून प्रथम क्रमांक व द्वितीय क्रमांक कुमारी नेहा बाळासो ७२.३० टक्के तर तृतीय क्रमांक कुमारी ऋतूजा सुभाष कोळी ७१.३६ इमार्क मिळाले आहे. व्यावसायिक शिक्षण विभागात कुमारी कोरडे प्राजक्ता दीपक ८४.० टक्के प्रथम क्रमांक पटकावला आहे. द्वितीय क्रमांक कुमारी तामगावे सुप्रिया बाळासो ८०.१५टक्के तर कुमार मुलाणी अलफाज सादिक ७३.७० टक्के मार्क मिळवून तिसरा क्रमांक पटकाविला आहे. सर्व यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचे भारती विद्यापीठाचे कार्यवाह डॉ. विश्वजित कदम,भारती विद्यापीठ शालेय समिती अध्यक्ष सौ. विजयमाला कदम,भारती विद्यापीठाचे मानद संचालक डॉ.एच.एम.कदम, प्राचर्य डॉ. डी. जी. कणसे, प्रा.श्रीकृष्ण मोहिते,डॉ.संतोष माने प्रा. अरूण जाधव प्रा. खडके बी.पी. डॉ. आनंद सपकाळ, प्रा. सुरेश माने, प्रा. सूर्यकांत बुरूंग आदींनी अभिनंदन केले.

पुढारी | सोमवार १० एप्रिल २०१७

# भारती विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा

**कडेगाव : रजाअली पिरजादे**

केंद्र सरकारच्या मानव संसाधन विभागाने देशातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांची मूल्यांकने नुकतीच जाहीर केली आहे. त्यामध्ये भारती विद्यापीठ पुणेला ए प्लस मानांकनासह अव्वल स्थान पटकावले आहे. त्यामुळे भारती विद्यापीठाच्या शिरपेचात मनाचा तुरा रोवला गेला आहे.

भारती विद्यापीठाच्या विविध शाखांनीही मानांकन प्राप्त केले आहे, त्यामध्ये कडेगाव येथील मातोश्री बयाबाई कन्या महाविद्यालयाने देशात ९९ वे तर राज्यात १२ वे मानांकन प्राप्त केले आहे. त्यामुळे सांगली जिल्ह्याची आणखी शान शिक्षण क्षेत्रात वाढली आहे. १० मे १९६४ साली भारती विद्यापीठाची स्थापना माजी मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी केली. जिद्द, चिकाटी, कष्ट करण्याची प्रवृत्ती असेल तर काय घडते हे, डॉ.पतंगराव कदम यांनी दाखवून दिले. अत्यंत कमी काळात भारती विद्यापीठाने विविधं क्षेत्रात गरुड भरारी घेतली आहे.

डॉ. पतंगराव कदम यांनी पुण्यात जावून जेव्हा भारती विद्यापीठाची स्थापना केली, त्यावेळी विद्येचे माहेर घर असलेल्या पुणेकरांच्या भुवया उंचावल्या.



शनिवार पेठेतील एका बोळात भारती विद्यापीठाचा बोर्ड पाहून त्यावेळी लोकांना आश्चर्य वाटले. पण डॉ.पतंगराव कदम डगमगले नाहीत. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आपल्या काही सवंगड्यांना बरोबर घेवून त्यांनी भारती विद्यापीठाची पताका पुढे रेटली. जेव्हा भारती विद्यापीठाची पुण्यातील पहिली उंच इमारत उभी राहिली, त्यावेळी लोकांनी आश्चर्याने आपली बोटे तोंडात घातली. बघता बघता भारती विद्यापीठाचा लावलेला छोटा वेलू गगनावरी गेला.

पुण्यात एरंडवणी, धनकवडी परिसरात शिक्षणाचे मळे फुलले. त्याच्या फांद्या महाराष्ट्रभर पसरल्या. बघता बघता गल्लीतील भारती विद्यापीठ दिल्लीत गेले आणि आता सातासमुद्रा पलीकडे विद्यापीठाने झेप घातली आहे. कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा जोतिबा फुले, छ.शाहू महाराज यांचा वारसा पतंगरावानी पुढे चालविला.

स्त्रियांना शिक्षण मिळावे या उद्देशाने त्यांनी कडेगाव येथे महिला शिक्षण केंद्र सुरू केले. आज भारती विद्यापीठात के.जी. पासून विविध शाखांचे ज्ञान दिले जाते. स्वतःच्या तालुक्यात आणि जिल्ह्यात शिक्षण सुविधा मिळाव्यात म्हणून त्यांनी कडेगाव, पलूस, सांगली, कराड येथे शिक्षणाच्या विविध शाखा सुरू केल्या. सांगलीत अद्यावत असे भारती हॉस्पिटल सुरू केले. कुणाचीही साथ न घेता डॉ.पतंगराव कदम यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या कामाचा गौरव केंद्र सरकारच्या मानव संसाधन विभागाने भारती विद्यापीठाला ए प्लस दर्जा आणि प्रथम मानांकन देवून केला आहे.

याबरोबर भारती विद्यापीठाच्या विविध शाखानाही मानांकन प्राप्त झाले आहे. याशिवाय इतर काही शाखांनाही मानांकन मिळाले आहे. ही गोष्ट कडेगाव बरोबर सांगली जिल्ह्याच्यादृष्टीने भूषणावह म्हणावी लागेल.

आज भारती विद्यापीठ म्हणजे ऐक्याचे प्रतीक मानले जाते. येथे सर्व जाती- जमाती आणि धर्मांचे विद्यार्थी मोठ्या गुण्या- गोविंदाने शिक्षण घेताना दिसत आहेत. आजपर्यंत भारती विद्यापीठाच्या शिरपेचात अनेक मनाचे तुरे खोवले गेले आहेत. त्यामध्ये आणखी एकं अत्यंत मानाचा हा तुरा रोवला गेला आहे. ही भारती विद्यापीठाच्यादृष्टीने अत्यंत अभिमानाची गोष्ट म्हणावी लागेल. यामागे डॉ.पतंगराव कदम, डॉ.शिवाजीराव कदम आणि डॉ. विश्वजित कदम यांचे कठोर परिश्रम कारणीभूत आहेत.